रे.क.नं. २२/२०२४

# मे.दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ट स्तर कळे खेरिवडे

यांचे कोर्टात.....

श्री.पांडुरंग महादेव गुरव — **वादी**

**विरूध्द**

जालिंदर महादेव गुरव — **प्रतिवादी**

**वगैरे**

**अर्ज -विलंब माफीकरीता**

**यात वादी तर्फे विनंती अर्ज की,**

१) वादी यांनी प्रतिवादी यांचे विरूध्द वाटणीसाठी दावा मे.कोर्टामध्ये दाखल केलेला आहे. वादी हे केर्ले ता.करवीर, येथे राहत असून दावा मिळकत ही यवलूज, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथे आहे.

२) सदर कामातील प्रतिवादी नं.१९ कै.बळवंत ज्ञानू गुरव हे दि. १८/७/१९९१ रोजी मयत झालेले आहेत. सदर प्रतिवादी नं.१९ कै. बळवंत ज्ञानू गुरव यांचे वारस वेळेत रेकॉर्डवर न घेतलेने मे.कोर्टानी वादी यांचेविरूध्द अबेटमेंटचा हुकूम केलेला आहे. सदर अबटमेंट हकूम रद्द करून प्रतिवादी नं.१९ कै.बळवंत ज्ञानू गुरव यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झालेला आहे. सदर वादी यांना प्रतिवादी नं.१९ यांचे वारसांना दाव्याचे कामी मुदतीत वारस रेकॉर्डवर आणणेसंबंधीचे कायदेशीर ज्ञान नसलेने वारस रेकॉर्डवर वेळेत आणता आले नाही. वादी यांनी प्रतिवादी नं १९ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस जाणुन बुजून विलंब केलेला नाही. सदरचा विलंब माफ होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. तसे न झालेस वादी यांचे फार मोठे व पैशाने कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. तरी सदर दाव्याचे कामी वादी यांचे विरूध्द

O
Otherside 17
Say
11/9/25
CJJD



Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

झालेला अबेटमेंटचा हुकूम रद्द होवून झालेला विलंब माफ होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. तसे न झालेस वादी यांचे अपरिमित व मोठे व पैशाने कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. याउलट प्रतिवादी यांचे काही एक नुकसान होणार नाही.

सबब प्रतिवादी नं.१९ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होवून मिळावा ही विनंती.

येणेप्रमाणे अर्ज असे.

कळे खेरिवडे

दि.~~१९~~ १० /०९/२०२५

A. J. Chougule

वादी तर्फे ॲडव्होकेट

## प्रतिज्ञा

यात मी श्री.पांडुरंग महादेव गुरव वय ५८ धंदा – शेती, सध्या रा. केर्ले ता.करवीर, जि.कोल्हापूर (मुळ गांव यवलूज ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर), आज मुक्काम कोल्हापूर, सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की, वर नमुद अर्जातील सर्व मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली ही प्रतिज्ञा.

कोल्हापूर
~~कळे खेरिवडे~~

दि.~~१९~~ १० /०९/२०२५

पां म गुरव

## ॲफिडेव्हिट

यात मी श्री.पांडुरंग महादेव गुरव वय ५८, धंदा – शेती, सध्या रा. केर्ले ता.करवीर, जि.कोल्हापूर (मुळ गांव यवलूज ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर), आज मुक्काम कोल्हापूर, सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की, वर नमुद अर्जातील/ॲफिडेव्हिट मधील सर्व मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले हे ॲफिडेव्हिट.



Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

कोल्हापूर
कळे, खेरिवडे

दि.११/०९/२०२५
१०

पां मे गुरव

सदर व्यक्तीस मी ओळखतो.

A.J. Chougule

ॲडव्होकेट
A.J. Chougule.

## प्रतिज्ञा

यात मी श्री.पांडुरंग महादेव गुरव वय ५८ धंदा – शेती, सध्या रा. केर्ले ता.करवीर, जि.कोल्हापूर (मुळ गांव यवलूज ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर), आज मुक्काम कोल्हापूर, सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की, वर नमुद ॲफिडेव्हिट मधील सर्व मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली ही प्रतिज्ञा.

कोल्हापूर
कळे खेरिवडे

दि.११/०९/२०२५
१०

पां मे गुरव

Solemnly Affirmed before me by
Shri. Pandurang Mahadev Gurav
of Kerle Tal. Karvir.....who is 91959
identified by Shri. Adv. A.J. Chougule..whom I know personally
Dated :-10-9-25

10-9-25
Assistant Superintendent

R/s,

वादींनी दाखल केलेला प्रस्तुत अर्ज कायद्यातील तरतुदींचे विरुद्ध असा असल्याने नामंजूर होणेस पात्र आहे. यातील वादींना सदर कामी प्र-वादी नं 19 चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी पुरेशी संधी दिलेली होती. वादींनी प्रस्तुत प्र-वादीचे वारस रेकॉर्डवर घेणेकरिता जाणीवपूर्वक टाळाटाळ केलेली आहे. त्यामुळे वादीविरुद्ध झालेला अबेटमेंट चा आदेश योग्य व बरोबर आहे.

सबब, वादींनी दाखल केलेला प्रस्तुत अर्ज नामंजूर करणेत यावा. त्याचे कारणास्तव प्रस्तुत अर्ज मंजूर करणेचा झालेस वादींना कॉस्ट करणेत येउन ती प्र-वादींना देणेबाबत आदेश व्हावेत ही विनंती आहे.

खेरवाडे

दि. 11/9/25

जोगिंदर महादेव गुरव 2, 18, 20
(प्र-वादी-1)

NO say order passed against defs. NO
[illegible] 11/9/25
CJJD

Pursis filed, application of say filed by def. NO 1. Application is hereby condoned subject to costs of Rupees 2000/- be given to def. NO 1.
[signature] 11/9/25
CJJD